# प्रेस नोट

दिनांक 02/08/2021 (सोमवार)

(दुपार)

---

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 15 कि. मी. अंतरावरील एन.एच–53 जयस्वाल ढाबाजवळ कढोली येथे दिनांक 01/08/2021 चे 01:00 वा. ते 01.15 वा. दरम्यान पोउपनि नितीन आगासे पोलीस स्टेशन मौदा हे नाईट डियुटी वर हजर असता डायरी अमलदार यांनी फोन दवारे माहिती दिली कि, मौजा कढोली शिवारात जयस्वाल ढाबाजवळ हायवे वर अपघात झाला आहे. अशा सुचने वरुन अपघात स्थळी पाहनी केली असता भंडारा कडून नागपूर कडे जाण–या एम.एच–36/–1201 क्रमांकाचा ट्रकचा चालक आरोपी नामे– रोशन बिसन शेन्डे याने त्याच्या ताब्यातील ट्रक रोडच्या मध्यभागी सुरक्षीततेच्या उपाययोजना न करता कोणतेही ईन्डीकेटर सुरु न करता धोकादायक रित्या उभा होता व त्याला मागेहून एम.एच.–40/वाय–9242 क्रमांकाचा आयसर ट्रक ने धडक देवून दोन्ही ट्रक अपघात स्थितीत दिसून आले. आयसर ट्रक चा चालक/मृतक नामे– यशवंत शामलाल यादव, वय 32 वर्ष, रा. सी/ओ प्लॉट न. 376 गूलाबराव शेन्डे बेण्नबाग मॉडन टाउन जरीपटका, नागपूर हा कॅबीन मध्ये फसला होता. त्याला काढणचा प्रयत्न केला परंतू तो निघाला नाही. माथनी टोल नाका येथील ॲब्यूलॅन्स व हायड्रा मशीन बोलवून लोकांच्या मदतीने आयसर ट्रकचा चालकाला काढण्यात आले त्यास डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी सरतर्फे सरतर्फे पोउपनि नितीन आगासे यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 283, 304 (अ) भादंवी. सहकलम 134 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि नितीन आगासे पोलीस स्टेशन मौदा मो.नं. 9130001715 हे करीत आहे.

## जबर दुखापत

1) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 03 कि. मी अंतरावर रिलॅक्स धाबा गहुहिवरा रोड, कन्हान येथे दिनांक 31/07/2021 चे दिनांक 20.30 वा. ते 21.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– योगेश उर्फ सोनू आनंगराव बोरकर वय 34 वर्ष रा पिपरी हा रिलॅक्स धाब्यावर हजर असता आरोपी नामे– ॲबरसिंग उर्फ चिकू गूडडू ठाकूर वय 23 वर्ष, रा रिलॅक्स धाबा गहुहिवरा रोड, कन्हान हा जेवन करण्याकरिता ठिकाण्याकरिता आपले मित्रासह आला व जेवन झाल्यावर धाब्यावर काम करणारा आशू व आरोपी ॲबरसिंग उर्फ चिकू गूडडू ठाकूर कांउटर उभे होते. त्सरदरम्यान फिर्यादीने आशू याला विचारले की यांचे काय आहे, त्यावर आशू याने सांगितले की, बिल घ्याचे तेव्हा फिर्यादीने आरोपीस म्हटले की, तुम बिल दे दो तेव्हा आरोपीने फिर्यादीस काही न बोलता धक्काबुक्की केली व आपले जवळील चाकू काढून फिर्यादीचे खालील भागात डाव्या बाजूला बरगंडीवर मारून फिर्यादीस गंभीर जखमी केले व तेथून निघून जाता वेळी तेरे को देख लूंगा असे म्हणुन धाब्याच्या बाहेर निघून गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 326, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला सुचनापत्रावर रिहा करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा नरेश वरखडे पो.स्टे. कन्हान मो.क्र. 9637005303 हे करीत आहे.

2) पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत अर्धा कि. मी अंतरावर सागर बार सिध्दार्थ नगर भिवापुर येथे दिनांक 01/08/2021 चे दिनांक 15.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– जतिन किशोर नागपुरे, रा. ब्रम्हपुरी जि.चंद्रपुर, ह.मु. सिध्दार्थ नगर, भिवापुर व त्याचे मित्र हे आपसात बोलत असतांनी आरोपी नामे– राहुल देवराव नागपुरे रा.ब्रम्हपुरी जि.चंद्रपुर व त्याचे मित्र अनोळखी हे फिर्यादीचे जवळ आले व लोखंडी सळाखीने दोन्ही पायाच्या पोटरीवर मारहाण केली. तसेच हातबुक्कीने तोंडावर नाकावर मारून जखमी केले. त्या दरम्यान फिर्यादीची पत्नी ही फिर्यादीला पाहण्याकरीता आली तेव्हा सुध्दा आरोपीने फिर्यादीचे पत्नीला लोखंडी काठीणे उजव्या हातावर मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम 326, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा चंद्रकांत रेवतकर मो.नं. 8888102302 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर